स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दिनांक :

# प्रेस नोट

## वसई विरार शहर महानगरपालिकेस INTERNATIONAL BOOK OF RECORDS मध्ये मानांकन प्राप्त

आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त (International Coastal Cleanup Day - ICCD) सर्व १३ किनारी राज्यांमध्ये राज्य सरकार/स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने समुद्रकिनारा स्वच्छता उपक्रम/मोहिम 21 सप्टेंबर 2024 रोजी आयोजित करण्याचे पर्यावरण व हवामान बदल विभाग, राज्य शासन यांनी निर्देश दिले होते. राष्ट्रीय किनारपट्टी कचरामुक्त करणेसाठी प्रोत्साहित करणे, जागतिक महासागर आणि जलमार्गांचे जतन व संरक्षण करण्याबद्दल लोंकामध्ये जागृकता निर्माण करणे हे हा दिवस साजरा करण्याचा मुळ उद्देश होता. त्याअनुषंगाने दि.21/09/2024 रोजी राजोडी बिच, विरार (पुर्व) येथे आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता दिनानिमित्त (International Coastal Cleanup Day - ICCD) वसई विरार शहर महानगरपालिका व गो-शुन्य प्रा. लि. यांच्या सहयोगाने स्वच्छता मोहिम राबविणेत आली. सदर मोहिमे अंतर्गत शहरातील स्वयंसेवक, शाळा, महाविद्यालये, NCC व NSS विद्यार्थी, महिला बचतगट, लोकप्रतिनिधी, पत्रकार वर्ग, सामान्य नागरीक, तसेच महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग असे एकुण १५,००० हून अधिक सहभागी उपस्थित होते. एकुण ५३ मेट्रिक टन कचरा संकलन करून त्यातील ६६२ कि.ग्र. प्लास्टिक कचऱ्याचे रिसायकल प्रात्याक्षिक (Demonstration) नागरीकांना दाखविण्यात आले.

INTERNATIONAL BOOK OF RECORDS मध्ये 1) सर्वात जास्त स्वयंसेवकांचा सहभाग 2) सर्वोच्च कचरा संकलन तसेच 3) प्लास्टिक कचऱ्याचे Live Recycling या तीन श्रेणीमध्ये मानांकन प्राप्त झाले आहे, असे श्री नानासाहेब कामठे, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी सांगितले.

वसई विरार शहराला विस्तीर्ण निसर्गरम्य समुद्रकिनारा लाभला आहे. किनारपट्टी स्वच्छता मोहिमेतून स्वच्छता, कचऱ्याचे विलगीकरण, रिसायकल, पुनर्वापर, प्लास्टिकचा कमीत कमी वापर आदि संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. मा. श्री अनिलकुमार पवार, आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका, यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत सदर उपक्रम राबविण्यात आलेला होता.

**कोट –**

"समुद्र किनाऱ्याचे सौंदर्य अबाधित ठेऊन, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी महापालिकेने सुरू केलेली ही मोहिम, केवळ आजची आवश्यकता नाही, तर आगामी पिढ्यांसाठी त्याचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे." महापालिका, स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून मोहिमेमध्ये सहभागी होणाऱ्यांच्या मदतीने समुद्र किनाऱ्यांच्या प्रदूषणाला नियंत्रित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

अनिलकुमार पवार (भा. प्र. से)
आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका